# ६ राष्ट्रीय बागवानी बोर्ड

भारताचे सद्याचे फलोत्पादन पिकांचे एकूण उत्पादन १५० दशलक्ष टन आहे. फलोत्पादन क्षेत्रातील या प्रगतीमुळे देशातील लहान. मध्यम शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला आहे. तसेच यामुळे आपल्या देशातील नागरिकांना पौष्टिक अन्नपुरवठा करण्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला आहे. फळे व भाजीपाला उत्पादनाच्या बाबतीत भारत जगामध्ये द्वितीय क्रमांकावर आहे. फलोत्पादन हे आपल्या कृषि क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचे गणले जात आहे. याच अनुषंगाने राष्ट्रीय बागवानी बोर्ड आपल्या देशातील शेतकरी व कृषि उद्योजकांना प्रेरित तसेच प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने महत्त्वाची भूमिका बजावित आहे. यामध्ये सुधारीत उत्पादन पद्धती, काढणी पश्चात तंत्रज्ञान व उत्पादन मूल्यवृद्धी या बाबींचा समावेश आहे. सदर योजना विविध घटक, अर्थसहाय्याचे स्वरुप व योजनेकरिता लाभार्थींची पात्रता या बाबतची माहिति खालीलप्रमाणे आहे.

१) फलोत्पादन व काढणी पश्चात व्यवस्थापनाद्धारे व्यापारक्षम फलोत्पादन क्षेत्राचा विकास :

<table>
<tr><th>योजनेचे घटक</th><th colspan="2">अर्थसहाय्याचे स्वरुप संबंधित योजना</th></tr>
<tr><td rowspan="5">
अ) फलोत्पादनाशी संबंधित :<br>
● उच्च प्रतिची फलोत्पादन पिके<br>
● पारंपारिक औषधी व सुगंधी वनस्पतींचे उत्पादन<br>
● बी-बियाणे व रोप वाटीका<br>
● जैव तंत्रज्ञान व उतीसंवर्धनाद्धारे कलमांचे व रोपांचे उत्पादन<br>
● जैविक पीक संरक्षक औषधे<br>
● सेंद्रिय पद्धतीने फलोत्पादन<br>
● कृषि चिकित्सालय/प्रयोगशाळा स्थापन करणे (बेरोजगार कृषि व फलोत्पादन पदवी धारकांसाठी)<br>
● फलोत्पादन सल्ला व सेवा<br>
● मधुमक्षिका पालन<br>
ब) फळ प्रक्रिया व काढणीपश्चात व्यवस्थापन संबंधित योजना :<br>
● फलोत्पादन पिकांचे ग्रेडींग, वॉशिंग, सुकविणे, पॅकिंग केंद्राची स्थापन करणे<br>
● पूर्वशीतकरण (प्रीकुलींग) व शीतकरण गृह<br>
● वाहतुकीसाठी शीतकरण वाहन/कंटेनर<br>
● फलोत्पादन पिकांच्या बाजारपेठेसाठी किरकोळ विक्री केंद्रे, लिलाव केंद्र स्थापन करणे.<br>
● बाजार केंद्र रोप वेज<br>
● किरणोत्सारी कक्ष/निर्जलिकरण कक्ष/बाष्प प्रक्रिया केंद्राची उभारणी<br>
● फलोत्पादन निगडीत उद्योग उदा. उपकरणे, प्लास्टिक, पॅकिंग व जैविक तंत्रज्ञान सेवा<br>
● क्रेटस् व कागदी खोके, निर्जंतुक वेस्टन जाळी इ.
</td>
<td colspan="2">प्रती प्रकल्प अंदाजपत्रक खर्चाच्या २०% अनुदान स्वरुपात रुपये २५ लाखापर्यंत (ईशान्य भारत व आदिवासी विभागाकरिता रुपये ३० लाख) फलोत्पादन काढणीपश्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रिया उद्योगाकरिता :<br>
अर्ज कसा करावा :<br>
● विहित नमुन्यामध्ये इरादापत्र (LOI) घेण्याच्या दृष्टिने अर्ज सादर करावा.<br>
● रुपये वीस लाखापर्यंतच्या खर्चाचे प्रकल्प संबंधित राज्याच्या राष्ट्रीय फलोत्पादन बोर्डाच्या कार्यालयाकडे सादर करावेत. खर्चाचे अर्ज राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या गुरगांव येथील मुख्य कार्यालयाकडे सादर करावेत.<br>
● पात्र प्रकल्पांकरिता मंडळ इरादा पत्र (LOI) देईल व त्याची मुदत इरादापत्र दिलेल्या तारखेपासून एक वर्ष राहील.<br>
● इरादापत्र मिळाल्यानंतर प्रकल्प लाभार्थ्यांने बँक/वित्तियसंस्थांकडे कर्ज मागणीकरिता संपर्क साधावा.<br>
● कर्ज मंजुरीनंतर दोन वर्षाच्या आत लाभार्थ्यांने प्रकल्प पूर्ण करावा.<br>
● रुपये ३० लाखापर्यंतच्या प्रकल्पाकरिता कर्ज रक्कम एकूण प्रकल्प खर्चाच्या किमान २५% असावी व रु. ३० लाखाच्या वरील प्रकल्पाकरिता कर्ज रक्कम एकूण प्रकल्प खर्चाच्या किमान ४०% असावी.</td></tr>
<tr><td colspan="2">अर्थसहाय्याचे स्वरुप संबंधित योजना</td></tr>
<tr><td colspan="2">अर्ज प्रक्रिया शुल्क</td></tr>
<tr><td>१) रु. १०.०० लाख पर्यंतचे प्रकल्प<br>२) रु. १०.०० ते २०.००<br>एकूण प्रकल्प<br>३) रु. २०.०० लाखापेक्षा<br>अधिक किंमतीचे प्रकल्प</td><td>०.१%<br>खर्चाच्या<br>०.२५%<br>एकूण खर्चाच्या<br>०.५०%</td></tr>
<tr><td colspan="2">ता. क. : २०% अर्ज प्रक्रिया शुल्क अर्जासोबत व<br>उर्वरित ८०% अनुदान वाटपाच्यावेळी</td></tr>
</table>

| २) फलोत्पादनासाठी शीतगृह उभारणी, विस्तार व आधुनिकरणासाठी भांडवली अनुदान योजना : | | |
|---|---|---|
| **योजनेचे घटक** | **अर्थसहाय्याचे स्वरुप संबंधित योजना** | |
| • शीतगृह<br>• नियंत्रित वातावरण/सुधारित वातावरण गृह<br>• कांदा चाळ | एकूण प्रकल्प खर्चाच्या २५% अथवा कमाल मर्यादा रु. ५०.०० लाखापर्यंत (ईशान्येकडील राज्याकरिता रु. ६०.०० लाख अथवा ३३%)<br>अर्ज कसा करावा<br>• ज्या प्रकल्पाकरिता कर्ज घ्यावयाचे असेल त्यांनी आपल्या कर्ज प्रकरणाचे अर्ज बँक वित्तिय संस्था, राष्ट्रिय सहकार विकास महामंडळाकडे प्रकल्प छाननीकरिता सादर करावेत.<br>• ज्या प्रकरणात कर्ज घ्यावयाचे नसेल व उद्योजक स्वखर्चाने प्रकल्प उभारु इच्छित असेल त्यांनी आपले अर्ज मंडळाकडे संमतीपत्र (IPA) घेण्याकरिता विहित नमुन्यात सादर करावेत. | |
| | अर्ज प्रक्रिया शुल्क : | |
| | १) रु. १०.०० लाख पर्यंतचे पत्रक | ०.१०% |
| | २) रु. १०.०० ते २०.०० | एकूण प्रकल्प खर्चाच्या ०.२५% |
| | ३) रु. २०.०० लाखापेक्षा अधिक किंमतीचे प्रकल्प | एकूण खर्चाच्या ०.५०% |

| ३) प्रगत तंत्रज्ञान विकास व विकसित तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहचावणे : | |
|---|---|
| • नवीन तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन देणे<br>• शेतकऱ्यांच्या देशांतर्गत सहली<br>• तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे | • प्रती प्रकल्प रु. २५.०० लाखापर्यंत<br>• प्रत्यक्ष खर्चानुसार<br>• रु. ५०,०००/- प्रती चर्चासत्र |

| ४) फलोत्पादन पिकांकरिता बाजारपेठेसंबंधी माहिती उपलब्ध करुन देणे : | |
|---|---|
| • बाजारपेठेतील घाऊक बाजारभाव मालाची आवक व बाजारपेठेतील उपलब्ध फलोत्पादन पिकांसंबंधीची इतर महत्त्वाची माहिती एकत्रित करणे, संकलन करणे व संकलित माहिती प्रसारमाध्यमे व प्रकाशनाद्धारे प्रसारीत करणे. | शेतकरी, निर्यातदार, व्यापारी तसेच संशोधन संस्थाकरिता |

| ५) फलोत्पादन क्षेत्राला चालना देण्याकरिता प्रोत्साहनपर योजना : | |
|---|---|
| • फलोत्पादन विकासाच्या सद्यस्थितीचे आकलन करुन विशिष्ट राज्य/क्षेत्राकरिता तांत्रिक व आर्थिक बाबींचा सविस्तर अभ्यास करणे.<br>• फलोत्पादन क्षेत्रातील अडीअडचणींचा अभ्यास करणे व त्यावरील उपाययोजना सुचविणे.<br>• अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना सुचविणे व विकसित करणे.<br>• संबंधित अभ्यासाकरिता सल्लागार तसेच तज्ञ व्यक्तिंची सेवा उपलब्ध करुन देणे. | • व्यावसायिक व तज्ञ सल्लागारांकरिता १००% अर्थसहाय्य |

**योजनांकरिता लाभार्थींची पात्रता :**

वरील सर्व योजनांकरिता फलोत्पादन शेतकऱ्यांची संस्था किंवा वैयक्तिक लाभार्थी खाजगी व्यावसायिक संस्था, महामंडळ व सहकारी संस्था, कृषि उत्पन्न बाजार समिती, पणन मंडळ, लघुउद्योग विकास महामंडळ, कृषि विद्यापीठे व इतर संशोधन संस्था, सेवाभावी संस्थांना (**NGO**) अर्थसहाय्य उपलब्ध राहील, परंतु वैयक्तिक लाभार्थी कृषि विद्यापीठ व इतर संशोधन करणाऱ्या संस्थांना शितगृह उभारणीकरिता असलेल्या योजनेत समावेश नाही.

कांदा चाळ योजनेकरिता वैयक्तिक लाभार्थिंनी बँकेचे कर्ज घेतले असेल तरच ते या योजनेकरिता पात्र ठरतील.


# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

***कृषि प्रक्रिया, अन्न प्रक्रिया आणि सुगी पश्चात व्यवस्थापन याकरिता***

*'प्रकल्प सल्ला सेवा'*

***कृषी प्रक्रिया, अन्न प्रक्रिया आणि सुगी पश्चात व्यवस्थापन संदर्भात -***

- **प्रकल्प अहवाल तयार करणे**
- **प्रकल्पास मार्गदर्शन करणे**
- **तांत्रिक सल्ला देणे**
- **आर्थिक नियोजन**
- **प्रशिक्षण**

***इ. सेवा 'प्रकल्प सल्ला सेवे' अंतर्गत पुरविण्यात येतील.***

वैशिष्ट्ये

- **स्वतंत्र प्रकल्प सल्ला विभागाची स्थापना**
- **१६ तज्ञांचा समावेश**
- **सेवा शुल्क फक्त २%**
- **सेंद्रिय मालाचे उत्पादन आणि विक्री, पशु संगोपन, कुक्कुटपालन, मत्स्यशेती इ. विविध विषयांबाबतही सेवा**

*संपर्क*

**प्रकल्प सल्ला विभाग प्रमुख**

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,**

**प्लॉट नं. आर-७, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे- ४११ ०३७**

**फोन - ०२०-२४२६११९० / २४२६८२९७ फॅक्स - ०२०-२४२७२०९५**

**वेब - www.msamb.com**